# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )

विद्यानगर, राजाराम कॉलेज जवळ, कोल्हापूर , पिन कोड- ४१६००४

फोननंबर-(०२३१)–२५२१०३८ वेबसाइट- www.gpkolhapur.org.in


जा.क्र. शातंनिको /परीक्षा विभाग / विषय नोंदणी /२०२४/२९६ दिनांक – २०/०९/२०२४

## परिपत्रक -

**विषय : – Direct Second Year च्या विद्यार्थ्यांसाठी विषय नोंदणी व परीक्षा अर्ज भरणे बाबत .**

सर्व Direct Second Year च्या विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, हिवाळी २०२४ विषम सत्रा करीताच्या विषयांची विषय नोंदणी व परीक्षा अर्ज खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे भरावयाचा आहे.

| Date | Programme |
|---|---|
| २१ सप्टेंबर२०२४ ते २५ सप्टेंबर २०२४ | All Programmes |

एकूण परीक्षा शुल्क ९०० रूपये.
(सत्र परीक्षा रुपये ७००/- + चाचणी परीक्षा रुपये २००/-)

१)विषय नोंदणी व परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासाठी प्रथमता विद्यार्थ्यांनी संस्थेच्या www.gpkolhapur.org.in ह्या सांकेतिक स्थळावर (Website) त्यांचे माहिती पत्रक (E-Registration) बिनचुक भरणे आवश्यक आहे. माहितीपत्रकामध्ये फोटो, ई-मेल ॲड्रेस, मोबाईल नंबर ची माहिती काळजीपूर्वक वाचून गरज असल्यास दुरुस्त करून घ्यावी. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःचाच मोबाईल नंबर व ई-मेल आयडी भरावा जेणेकरुन संगणक प्रणालीचा वापर विद्यार्थी वैयक्तीकपणे करू शकतील. विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधित व इतर कार्यालयीन कामकाजाकरीता माहिती पत्रकामध्ये नोंदणी केलेल्या या मोबाईल नंबर व ई-मेल आयडी व्दारे सुचना देण्यात येतील.

२)आपला पासवर्ड विद्यार्थ्यांनी गोपनिय ठेवावा, तसेच तो विसरणार नाही याची दक्षता घ्यावी. पासवर्ड विसरल्यास रुपये१००/- इतके शुल्क भरून पासवर्ड घेता येईल.

३)सर्व विद्यार्थ्यांनी विषम सत्र २०२४ करीताच्या विषय नोंदणी संबंधी आपल्या विभागातील नोंदणी अधिकारी / वर्गशिक्षक यांच्याशी संपर्क साधून योग्य ते मार्गदर्शन घ्यावे व नंतर ऑनलाईन अर्ज भरावा.

४)एकदा विषय नोंदणी/ परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांने ऑनलाईन Save केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत विषय नोंदणी अधिकारी / वर्ग-शिक्षक यांचे कडून बदल करून घ्यावा व त्यानुसार केलेल्या बदलाची खात्री करून सुधारीत प्रत जवळ ठेवावी.

५)विषय नोंदणी व परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्तीने भरल्यानंतर विषयनोंदणी/परीक्षा अर्जाची छापील प्रत घेऊन शैक्षणिक व इतर फी ऑनलाईन पद्धतीने आकारण्यासाठी विद्यार्थी विभागाशी आवश्यकता असल्यास संपर्क साधावा. विद्यार्थी विभागाने आकारलेले शैक्षणिक शुल्क, इतर फी व परीक्षा फी ऑनलाईन पध्दतीने एकत्रीत भरावी. फी पावतीची छापील प्रत घ्यावी. या पावतीची दुय्यम प्रत व विषयनोंदणी अर्ज विभागातील विषय नोंदणी अधिकारी यांच्याकडे कायम करणेसाठी (confirm ) जमा करावे. विषय नोंदणी अधिकारी दिनांक २३ सप्टेंबर२०२४ ते दिनांक २५ सप्टेंबर२०२४ या कालावधीत अर्ज कायम (confirm) करतील.

६)विद्यार्थी विभागाकडून मार्क केलेली फी भरणे बंधनकारक आहे.
विषय नोंदणी अधिकारी यांच्या कडून अर्ज कायम केल्याशिवाय विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

अर्ज भरताना काही तांत्रिक अडचण आल्यास परीक्षा विभागामध्ये संपर्क साधावा.

२०/९/२४

(कॅप्टन.डॉ. नि.पा.सोनजे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

प्रत :-

१. सर्व नोटीस बोर्डवर जाहीर..
२. रोखपाल व विद्यार्थी विभाग यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
३. सर्व विभागाना जाहीर करणेसाठी.
४. संस्थेच्या सांकेतिक स्थळावर (Website).